अवतीभवती



कांचनवाडी : माजी महापौर नंदकुमार घोडेले यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अनिता घोडेले यांच्यासह मान्यवर.

साई वृंदावन कॉलनीत गुणवंतांचा सत्कार

कांचनवाडी : पैठण रोडवरील साई वृंदावन कॉलनीत दहावी-बारावी परीक्षेतील उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा माजी महापौर नंदकुमार घोडेले यांच्या हस्ते सत्कार केला. रविवारी सकाळी कॉलनीतील सभागृहात हा कार्यक्रम झाला. यावेळी माजी महापौर अनिता घोडेले, मुक्त विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड, उपकुलसचिव डॉ. संजस कवडे, डॉ. विष्णू कराळे, सारंग जगताप, सुधीर नेहुल, राजू कवडे, ज्ञानेश्वर देशमुख, विजय मस्के, निशिकांत बाबर, नारायण डोंगरे , गिरीश गायकवाड, सुरेंद्र शेट्टी, शैलेश लोहाडे आदींची उपस्थिती होती. गुणवंत विद्यार्थी रुजल कवडे, ओजस देशमुख, सुजल डोंगरे, सर्वेष म्हस्के, चरित शेट्टी, समरजित बाबर, गौरी गायकवाड, राजलक्ष्मी जगताप, अपूर्वा हिवराळे, अर्पिता कराळे यांचा सत्कार केला.

आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. पुष्पलता जाधव यांचे यश

छत्रपती संभाजीनगर : देवगिरी महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. पुष्पलता नारायणराव जाधव यांनी दुबई येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत सादर केलेल्या शोधनिबंधास प्रथम पारितोषिक मिळाले आहे. दुबई येथील अबुधाबी युनिव्हर्सिटी कॅम्पसमध्ये नुकतीच 'ग्लोबल सस्टेनेबल डेव्हलपमेंट' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद पार पडली. या परिषदेत डॉ. जाधव यांनी 'स्क्रीनिंग ॲण्ड आयसोलेशन ऑफ फॉस्फेट सॉल्युबयसिंग मायक्रो ऑरगॅनिझम्स फ्रॉम सॉइल सॅम्पल्स कलेक्टेड फ्रॉम औरंगाबाद फार्म लँड्स' या विषयावर शोधनिबंध सादर केला. यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस आमदार सतीश चव्हाण, स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य पंडितराव हर्षे, प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, उपप्राचार्य डॉ. अपर्णा तावरे, डॉ. रवी पाटील, डॉ. मोहिते यांनी त्यांचे अभिनंदन केले.



डॉ. पुष्पलता जाधव

प्रॉपर्टीच्या वादातून भावाला बहिणीची मारहाण

जाधववाडी : प्रॉपर्टीच्या वादातून बहिणीने व मेहुण्याने भावाला लोखंडी रॉडने मारहाण केली. जाधववाडी येथे हा प्रकार घडला. याप्रकरणी दोघांविरुद्ध हर्सूल पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी गजानन विनोद वाघमोडे (वय ३४, रा. वसंतनगर, जाधववाडी) यांनी तक्रार दाखल केली. यामध्ये वाघमोडे यांच्याशी घराच्या प्रॉपर्टीवरून बहीण स्वाती व्यंकटेश यडले आणि व्यंकटेश माधवराव यडले (दोघे रा. हरियाणा) यांनी वाद घातला. तसेच वाघमोडे यांच्या डोक्यात गज मारत जखमी केले. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, जमादार काकडे तपास करीत आहेत.

'बहिणीला त्रास का देतो' म्हणत मारहाण

चिकलठाणा : बहिणीला त्रास का देतो, म्हणत तरुणाच्या डोक्यात दारूची बाटली मारत जखमी करण्यात आले. हा सोमवारी (ता. नऊ) प्रकार चिकलठाणा येथील आठवडे बाजारात घडला. याप्रकरणी दोन आरोपींविरुद्ध सिडको एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी गणेश शांताराम घुले (वय ३७, रा. चिकलठाणा) यांनी तक्रार दाखल केली. यामध्ये घुले हे राजू वसंत जगधने आणि राजू मुजमुले यांच्यासोबत आठवडे बाजारात दारू पीत बसले होते. यावेळी राजू याने माझ्या बहिणीला त्रास का देतो, असे म्हणत मारहाण करीत डोक्यात दारूची बाटली मारली. याप्रकरणी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून जमादार जहीर शेख तपास करीत आहेत.

करमाड, पिंपरीतील उपबाजारपेठ वरदान

सभापती डॉ. राधाकिसन पठाडे यांची माहिती, शेतकऱ्यांचा पैसा आणि वेळही वाचला

छत्रपती संभाजीनगर : उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून करमाड व पिंपरी येथे उपबाजारपेठ उभारल्यामुळे शेतकऱ्यांना याचा चांगला फायदा झाला आहे. भाजीपाल्यासह फळपीक विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांचा पैसा आणि वेळही वाचला आहे. या भागातील शेतकऱ्यांना परिसरातच उपबाजारपेठ उपलब्ध झाल्यामुळे तरुण शेतकऱ्यांची मुले व्यावसायिक बनल्याची माहिती उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती डॉ. राधाकिसन पठाडे यांनी 'थेट भेट'मध्ये सांगितले.



थेट भेट

छत्रपती संभाजीनगर येथील उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती ही मोठी बाजार समिती आहे. २०१७ मध्ये बाजार समितीचे उत्पन्न तीन कोटींपेक्षा कमी होते. अडीच वर्षांत हे उत्पन्न तीन कोटी ८७ लाखांपर्यंत पोचले. मध्यंतरी विरोधक प्रशासक असताना त्यांनी या उत्पन्नात घट करून ते एक कोटी ९९ लाखांपर्यंत आणून ठेवले. त्यानंतर पुन्हा मी प्रशासक झाल्यानंतर हे उत्पन्न साडेचार कोटींपर्यंत पोचवले. बाजार समितीत शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करत असल्याने सभासदांनी मला दुसऱ्यांदा उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतिपदी विराजमान केले. आता बाजार समितीचे वार्षिक उत्पन्न सहा कोटी ४७ लाखांपर्यंत नेऊन ठेवले आहे. सरकार बाजार समितीला कुठलाही निधी देत नाही, स्वतः तयार केलेल्या उत्पन्नातूनच सर्व खर्च करून भौतिक सुविधा पुरवाव्या लागतात. शेतकऱ्यांसाठी वेगवेगळ्या भागांत उपबाजारपेठा उभारण्यात येत आहेत. आज करमाडसारख्या उपबाजारपेठेतून मोसंबी, आंबा, डाळिंब दिल्लीसह इतर राज्यांत जाते. बाजार समितीच्या परिसरात आता २४ तास मार्केट उपलब्ध करून देण्यासाठी मार्किंग करण्यात येत आहे. त्याचबरोबर फुलांचे मार्केट शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले आहे. महापालिकेला २००७ मध्ये बाजार समितीने प्लॅन मंजूर करण्यासाठी दिला होता; तो २०१८ ला मंजूर झाला. एवढा कालावधी लागत असेल तर तोपर्यंत थांबायचे कसे? हा प्रश्न उपस्थित होतो. उत्पन्न वाढीसाठी पेट्रोलपंप सुरू करून दररोज सुमारे वीस हजार रुपये उत्पन्न बाजार समितीला आता सुरू झाले आहे. असे आगळेवेगळे उत्पन्नाचे सोर्स बाजार समितीच्या माध्यमातून तयार करून सहकारी संस्था टिकविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करत असल्याचे सभापती डॉ. राधाकिसन पठाडे यांनी सांगितले.

वसतिगृहाचा फायदा शेतकऱ्यांच्या मुलांना

शेतकऱ्यांच्या मुलांसाठी वसतिगृह हा राज्यातील पहिलाच प्रयोग उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समिती राबवत आहे. बाजार समिती ही शेतकऱ्यांच्या मालकीची असून शेतकऱ्यांच्या व पाल्यांच्या आग्रहाखातर बाजार समितीच्या जागेतच वसतिगृह उभारण्यात येत आहे. हे वसतिगृह उभारल्यानंतर याचा फायदा स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांना होणार आहे.

300 शेतकऱ्यांना बसण्याची व्यवस्था

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात शेतकऱ्यांना आपला शेतीमाल थेट ग्राहकांना विकण्यासाठी बाजार समितीने सुमारे ३०० शेतकऱ्यांची बसण्याची व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होत आहे.

शेतमालासाठी दोन हजार मेट्रिक टन स्टोरेज

बाजार समितीच्या परिसरात शेतमाल स्टोरेज करण्यासाठी सुमारे दोन हजार मॅट्रिक टन क्षमतेचे स्टोरेज भरलेले आहे. यामुळे शेतकऱ्यांचा शेतीमाल खराब होत नाही.

मोकाट जनावरांचा बंदोबस्त

महापालिकेला बाजार समितीच्या मालमत्तेच्या करापोटी सुमारे चार कोटी रुपये कर दिला जातो. परंतु, या भागात मोकाट जनावरांचा त्रास शेतकरी व व्यापाऱ्यांना होत आहे. त्यामुळे महापालिकेने मोकाट जनावरांचा बंदोबस्त करणे गरजेचे आहे.

विरोधकांच्या काळात उत्पन्न घटले

बाजार समितीत विरोधक प्रशासक असताना त्यांनी एकही वीट बाजार समितीच्या उत्पन्न वाढीसाठी लावली नाही. मी प्रशासक झाल्यानंतर उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न केले. त्यानंतर सभापती झाल्यावर साडेचार कोटींवरून साडेसहा कोटींपर्यंत वार्षिक उत्पन्न बाजार समितीचे वाढवले आहे.



फसवणूक होऊ नये यासाठी तत्पर

बाजार समितीच्या परिसरात कुठल्याही व्यापाऱ्याची किंवा शेतकऱ्याची फसवणूक होऊ नये यासाठी मी स्वतः माझा मोबाइल नंबर प्रत्येक ठिकाणी दिलेला आहे. फोन आल्यानंतर काही मिनिटांतच बाजार समितीचे कर्मचारी संबंधित व्यापाऱ्याची किंवा शेतकऱ्याची भेट घेऊन चर्चा करतात.

लोकप्रतिनिधी म्हणजे दुवा

राजकीय नेत्याचे पाठबळ असल्यावर स्थानिक स्वराज्य संस्था बळकट होतात. त्यामुळे प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेत लोकप्रतिनिधी असणे गरजेचे आहे. इच्छाशक्ती असणारे अधिकारी किंवा लोकप्रतिनिधी आपल्या कामात सातत्य ठेवून काम करतात. त्यामुळे लोकप्रतिनिधी हा जनता आणि प्रशासनातील दुवा असणे गरजेचे आहे.

प्रोसेसिंग युनिट उभारणार

लाडसावंगी येथे १३ एकर जागा उपबाजारपेठ उभारण्यासाठी घेतलेली आहे. येथे प्रोसेसिंग युनिट उभारण्यासाठी शासनाकडे परवानगी मागविण्यात येत आहे. परवानगी मिळाल्यानंतर मोठ्या प्रमाणात प्रोसेसिंग युनिट या भागात सुरू होईल, असेही त्यांनी सांगितले.

पीडब्ल्यूडी इमारतीची निविदा प्रक्रिया संथ

नियमांची पायमल्ली, अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार

छत्रपती संभाजीनगर, ता. ११ : सार्वजनिक बांधकाम विभाग ६२ कोटी रुपयांची भव्य प्रशासकीय इमारत उभारणार आहे. यासाठी निविदा प्रक्रिया सुरू असून तांत्रिक बीड खुले झाले आहे, मात्र दहा दिवस उलटूनही पुढचे आर्थिक बीड अद्याप खुले केले नाही. निविदा प्रक्रियेच्या सर्व नियमांची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पायमल्ली होताना दिसत आहे.

जालना रोडवरील उच्च न्यायालयाच्या लगत असलेल्या जागेवर सार्वजनिक बांधकाम विभागाची भव्य प्रशासकीय इमारत उभारण्यात येणार आहे. यासाठी पीडब्ल्यूडी विभागातर्फे ६२ कोटी ४९ लाख १३ हजार ५७० रुपयांची निविदाही प्रकाशित केली. यात जवळपास सहा संस्थांनी अर्ज केले आहेत. दरम्यान २८ मे रोजी तांत्रिक बीड खुले करण्यात आले असून संबंधित संस्थांना त्रुटी असलेल्या कागदपत्रांची पूर्तताही करण्यात आलेली आहे. या प्रक्रियेला जवळपास दहा दिवस पूर्ण झाले आहेत.

यात शासन निर्णया नुसार,निविदा धारकाच्या उपस्थित मुद्द्याचे निराकरण करून अंतिम पात्र निविदाधारकांची यादी प्रकाशित करणे अनिवार्य आहे, परंतु या नियमाचे पालन होत नसून हे काम मर्जीतील कंत्राटदाराला मिळावे म्हणून ई-निविदाच्या प्रक्रियेला छेद देत टेंडर प्रक्रियेमध्ये रिंग होत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

अशी आहे ई-निविदा प्रक्रिया

■ **शासनाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ई-निविदे अधिक सुसूत्रता यावी यासाठी निविदाप्रक्रियेत २०१७ ला सुधारित परिपत्रक काढले. यात निविदा प्रसिद्धी, लिफाफे उघडणे, तपासणी व स्वीकारणे या बाबत स्पष्ट सूचना दिल्या. यानुसार पंधरा कोटी पेक्षा जास्त किंमतीच्या निविदा असल्यास वृत्तपत्रात निविदा प्रसिद्ध करणे, लिफाफा क्र.१ (तांत्रिक लिफाफा) उघडणे, प्रसिद्ध केलेल्या निविदा प्राप्त होण्याचा किमान कालावधी एसबीडी निविदा साठी (४५ दिवस), निविदा पूर्व बैठका(दहा दिवस), सीएसडी अपलोड करणे (तीन दिवस), लिफाफा क्र.१ची समिती मार्फत पडताळणी करणे (दहा दिवस), तर निविदा धारकाच्या उपस्थित मुद्द्यांचे निराकरण करणे व अंतिम पत्र निविदाधारकांची यादी करणे (दहा दिवस) तर लिफाफा क्र.२(वित्तिय लिफाफा उघडणे-१ दिवस) त्यानंतर निविदा मंजुरीचा प्रस्ताव तयार करून सक्षम अधिकाऱ्यांकडे मंजुरीसाठी सादर करणे (पाच दिवस) असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.**

तक्रार निवारण दिवस महिन्याच्या दोन तारखेला

छत्रपती संभाजीनगर, ता. ११: प्रलंबित तक्रारींचे निराकरण करण्यासाठी जिल्हा प्रशासन तक्रार निवारण दिवस राबविणार आहे. दर महिन्याच्या दोन तारखेला जिल्हास्तरावर, तर एक तारखेला उपविभागीय स्तरावर तक्रार निवारण दिवस आयोजित केला जाणार आहे. याची सुरवात या महिन्यात उपविभागीय स्तरावर १८, तर जिल्हा स्तरावर २० जून रोजी तक्रार निवारण दिवस आयोजित करण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी यासंदर्भात मंगळवारी (ता. दहा) निर्देश दिले आहेत. त्यानुसार, प्रत्येक महसूल कार्यालयात तक्रार पेटी व क्यूआर कोडद्वारे ऑनलाइन तक्रार प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. जुलैपासून दर महिन्याच्या १ तारखेला (सुटी असल्यास दुसऱ्या दिवशी) उपविभागीय व तहसील कार्यालयात आणि दोन तारखेला जिल्हाधिकारी कार्यालयात हा दिवस राबविण्यात येईल.

आराखड्यात झालरचा विसर

स्मशानभूमी, कब्रस्तानाचीही आरक्षणे वगळली

छत्रपती संभाजीनगर, ता. ११ : राज्य शासनाने मंजूर केलेल्या विकास आराखड्यात गंमतीदार प्रकार समोर येत आहेत. नगर विकास विभागाला शहराच्या 'झालर'चा विसर पडल्याचे समोर आले आहे. सातारा-देवळाई परिसरातील स्मशानभूमी, कब्रस्तानची टाकण्यात आलेली आरक्षणे वगळण्यात आली आहेत.

राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने मंजूर केलेल्या विकास आराखड्यात शहराच्या अनेक भागातील रस्ते वगळण्यात आली आहेत. काही भागातील रस्त्यांची रुंदी कमी करण्यात आली आहे. तसेच आरक्षणेही कमी करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. आता झालर पट्ट्यात देखील असेच प्रकार सुरू आहेत.

या भागाचा आराखडा सिडकोने तयार केला होता. झालर पट्ट्याच्या आराखड्यात सातारा-देवळाई भागामध्ये हिंदू स्मशानभूमी, बौध्द स्मशानभूमी, कब्रस्तानसाठी आरक्षण ठेवण्यात आले होते. राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने शहराचा विकास आराखडा मंजूर करताना सातारा-देवळाई भागातील झालर पट्ट्यातील स्मशानभूमी आणि कब्रस्तानचे आरक्षण वगळण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

चंपा चौक ते जिन्सी या रस्त्याच्या रुंदीकरणासाठी महापालिकेने संबंधित मालमत्ताधारकांना टीडीआर दिलेला असताना विकास आराखड्यात या रस्त्याची असाईनमेंट बदलून रस्ता सरकवण्यात आल्याचे चित्र आहे. मकई गेट ते बेगमपुरा या रस्ता पूर्वीच्या विकास आराखड्यात तीस मीटर रुंदीचा होता, नव्याने मंजूर करण्यात आलेल्या आराखड्यात तो २४ मीटर चा करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

कागदपत्रे तपासतो क्लर्क!

सोमय्या यांच्या जन्मप्रमाणपत्र आढाव्यात उघड

छत्रपती संभाजीनगर, ता. ११ : विलंबित जन्मनोंदणी तपासणी प्रकरण चर्चेत असताना, घाटीत जन्मप्रमाणपत्र देताना येथील क्लर्कच सादर केलेली कागदपत्रे व्हेरिफाय करतो. यासाठी मोबाइल क्रमांकही त्याचाच दिला जात असल्याची धक्कादायक बाब भाजप नेते किरीट सोमय्या यांनी बुधवारी (ता. ११) घाटीत घेतलेल्या आढाव्यात समोर आली.

शासकीय वैद्यकीय महविद्यालय व रुग्णालयात मागील १७ महिन्यांत ४ हजार ९६७ बेकायदेशीर जन्मनोंदींचा घोटाळा झाल्याचा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला होता. यानंतर सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने विलंबित जन्मनोंदींची तपासणी करण्यासाठी चार सदस्यांची समिती गठित केली आहे. यात ही समिती चौकशी करणार आहे. सध्या वैद्यकीय शिक्षण विभागाच्या वतीनेही स्वतंत्र समिती या प्रकारात तपासणी करीत आहे. त्यात बुधवारी सोमय्या दुपारी घाटी रुग्णालयात दाखल झाले. यात येथील क्लर्कच ही सर्व प्रक्रिया करीत असल्याचे समोर आले. विशेष म्हणजे, येथे व्हेरिफिकेशनसाठी मोबाइल क्रमांक हा वैद्यकीय अधीक्षकांचा द्यायला हवा. परंतु, तसे होत नसल्याचे समोर आले. यावेळी जन्मप्रमाणपत्र तपासणी समितीतील सदस्यांसह, प्रभारी अधिष्ठाता डॉ. श्रीनिवास गडप्पा, विशेष कार्य अधिकारी डॉ. सुरेश हरबडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. गायत्री तडवळकर, डॉ. प्रसाद देशपांडे यांची उपस्थिती होती.

घाटीत तीन दिवसांत जन्म प्रमाणपत्र देण्याचे नियोजन

■ **घाटी रुग्णालयात आता मूल जन्मल्यानंतर तीन दिवसांत जन्म प्रमाणपत्र देण्याचे नियोजन केले आहे. यानुसार विभागातच सिस्टिम लावून, ही प्रक्रिया केली जाणार आहे. यानुसार यापुढे रुग्णालयातून सुटी होण्यापूर्वीच जन्मप्रमाणपत्र दिले जाणार आहे. आठवडाभरातच ही प्रक्रिया होणार असल्याचे समजते.**

सोमय्या येथे आल्यानंतर अधिकाऱ्यांची धावपळ उडाली. ते थेट अधिष्ठातांच्या दालनात गेल्यानंतर संबंधित क्लर्कपासून सगळेच प्रमुख अधिकारी तेथे होते. यावेळी सगळ्यांची धडधड वाढली. सोमय्या यांनी ''जे काही आहे ते सत्य सांगा, खोटं बोलाल तर लगेच अडकाल, कारण मला सर्वकाही माहीत आहे,'' असे म्हणताच सर्व माहिती समोर आली.

रिक्षातील ५ लाखांचा ऐवज मालकाला परत

छत्रपती संभाजीनगर, ता. ११ : रिक्षात प्रवाशाचा पाच लाखांचा विसरलेला ऐवज रिक्षाचालकाचा शोध घेत जवाहरनगर पोलिसांनी मूळ मालकाकडे सुपूर्द केला. मंगळवारी रात्री दहाला हा प्रकार सूतगिरणी ते रेल्वेस्टेशनदरम्यान घडला. यामध्ये साडेतीन तोळे सोने आणि रोख एक लाख रुपयांचा समावेश होता.

याप्रकरणी प्रवीण कामाजी हलबुर्गे (वय २९, रा. गारखेडा) हा प्रवासी मंगळवारी रात्री दहाला नांदेडला जाण्यासाठी सूतगिरणी चौकातून रिक्षात बसला होता. रेल्वेस्टेशन येथे तो उतरल्यानंतर घाईमध्ये त्याची बॅग रिक्षातच विसरली. या बॅगमध्ये साडेतीन तोळ्याचे सोन्याचे दागिने आणि रोख एक लाख रुपये होते.

दुसऱ्या दिवशी हलबुर्गे हे जवाहरनगर पोलिस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेले. पोलिसांनी सूतगिरणी चौकातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले, त्या रिक्षाचा क्रमांक मिळाला. त्या क्रमांकावरून पोलिसांनी इंदिरानगर येथील बोर्डे या रिक्षाचालकाचा शोध घेतला. रिक्षाचालक बोर्डे यांनी हलबुर्गे याची बॅग ऐवजासहित जपून ठेवली होती. पोलिसांनी ही बॅग ताब्यात घेत मूळ मालक हलबुर्गे यांच्याकडे सुपूर्द केली. रिक्षचालक बोर्डे यांनी दाखविलेल्या प्रामाणिकपणाबद्दल पोलिसांनी त्याचे पुष्पगुच्छ देत आभार मानले. पीएसआय संजय बनकर व जमादार शोन मनोहर पवार यांनी ही कारवाई केली.

सावकारांनो, व्याजदराचा फलक लावा, अन्यथा परवाना निलंबित

छत्रपती संभाजीनगर, ता. ११ : सहकार विभागाने सावकारांसाठी नियमावली घालून दिली आहे. यामध्ये सावकारांना दर्शनी भागात व्याजदराचे फलक आणि परवान्याची प्रतही दिसेल, अशा पद्धतीने लावावी लागणार आहे.

सहकार विभागाचे आयुक्त दीपक तावरे यांनी यांदर्भात परिपत्रक जारी केले आहे. त्यानुसार तीन बाय दोन फुटांच्या फलकावर सावकाराचे नाव, परवाना क्रमांक, कार्यक्षेत्र, परवाना देणाऱ्या कार्यालयाच्या नावासह तारण, विनातारण कर्जाचे व्याजदार आदींचा तपशील लिहावा लागणार आहे. महत्त्वाचे म्हणजे राज्यभरातील जवळपास १२ हजार परवानाधारक सावकारांना येत्या १५ जूनअखेर हा तपशील दर्शनी भागात फलकावर लावावा लागेल.

असा आहे व्याजदर

■ **सहकार विभागाने परवानाधारक सावकारांसाठी दोन पद्धतींच्या कर्जाचा व्याजदर ठरवून दिलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांसाठी तारण कर्जावर प्रतिवर्ष ९ टक्के, तर विनातारण कर्जासाठी प्रतिवर्ष १२ टक्के व्याजदर आहे. शेतकऱ्यांव्यतिरिक्त इतर व्यक्तींना देण्यात येणाऱ्या तारण कर्जावर प्रतिवर्षी १५ टक्के, तर विनातारण कर्जावर १८ टक्के व्याजदर आकारण्यासाठी परवानगी देण्यात आली असून, हे व्याजदर अधिकतम आहेत.**

> परवानाधारक सावकारांनी नियमानुसार फलक लावावा. न लावल्यास संबंधित सावकारांचे परवाने निलंबित करण्यात येतील. याशिवाय ठरवून दिलेल्या व्याजदरांपेक्षा अधिक दर आकारल्यास अवैध सावकारी घोषित करून तरतुदीनुसार फौजदारी कारवाईही करण्यात येईल.
>
> **— शरद जरे,** विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था.

तरुणाला लोखंडी रॉडने मारहाण

हडको : जुन्या वादातून तरुणाची दुचाकी अडवून त्याला लोखंडी रॉडने मारहाण केली हा प्रकार साठे चौक, एन-११ परिसरात घडला. याप्रकरणी चार आरोपींविरुद्ध सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला.

याप्रकरणी अक्षय ज्ञानदेव जगताप (वय २६ रा. एन ११) यांनी तक्रार दाखल केली. यामध्ये जगताप आणि त्याचा मित्र दुचाकीवर साठे चौकातून जात होते. यावेळी आरोपींनी दुचाकी आडवी लावत जगतापला अडवले. यानंतर जगताप आणि त्याच्या मित्राला शिवीगाळ करीत लोखंडी रॉडने मारहाण केली. यात जगताप गंभीर जखमी झाला. याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला असून हवालदार माळूकर तपास करीत आहेत.

पंजाब नॅशनल बँक (भारत सरकारचा उपक्रम) | punjab national bank (Govt. of India Undertaking)

एआरएमबी, नाशिक
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.co.in

सांकेतिक ताबा सूचना
(अचल संपत्तीकरीता)

खालील सही करणाऱ्यांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकस्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटी इंटरेस्ट इन्फोर्समेंट नियम २००२ च्या कलम १३ (१२) चे अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन पंजाब नॅशनल बँकेचे अधिकृत अधिकारी या नात्याने संबंधित कर्जदारांना खालील लिहिलेल्या तारखेला मागणी सूचना दिली होती त्या सूचनेत नमूद केलेल्या रक्कमेची उक्त सूचना प्राप्त होणाऱ्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परतफेड करण्याची मागणी सूचना प्रस्तूत केले.

कर्जदार हे रकमेची परतफेड करण्यास अपयशी ठरल्याने कर्जदार व सर्व सभासद जनतेला एतद्वारा सूचना देण्यात येते की खालील सही करणाऱ्याने उपरोक्त नियमाचा ८ सह वाचल्या जाणाऱ्या उपरोक्त कायदयाचा १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन यात खालील वर्णन केलेल्या संपत्तीचा सांकेतिक ताबा घेतलेला आहे.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यसाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायदयाच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदार /तारणदाराचे लक्ष वेधण्यात येत आहे.

शाखेचे नाव	कर्जदार / खातेधारकाचे नाव	गहाण ठेवलेल्या संपत्तीचे विवरण	डिमांड नोटीस तारीख	सांकेतिक ताबा घेण्याची तारीख	कर्जाची बकाया रक्कम
समर्थनगर औरंगाबाद (०७०९१०)	कर्जदार - मे. शिवराज मिल्क फुड ॲन्ड ॲग्री प्रोडक्ट प्रोप्रा. प्रमोद तुकाराम नरवडे	रहिवाशी प्लॉट नं.०७, गट नं.७८, चित्तेगाव, ता. पैठण, जि. संभाजीनगर (औरंगाबाद) प्लॉट एरिया ६२.४२६ स्क्वे.मी. मालकी हक्क - श्री. प्रमोद तुकाराम नरवडे. चतुःसिमा- पुर्व - गट नं. प्लॉट नं.०६, पश्चिम - प्लॉट नं.०८, उत्तर- रस्ता, दक्षिण - रस्ता	१९/०७/२०१७	१०/०६/२०२५	रु. ७४,७६,०६९.००/- ३१/१२/२०१६ पर्यंत + त्यानंतर व्याज व इतर खर्च

दिनांक : १२/०६/२०२५
ठिकाण : औरंगाबाद

स्वाक्षरी/-
श्री. वेंकटेश एस.
मुख्य प्रबंधक व अधिकृत अधिकारी
पंजाब नॅशनल बँक

स्वैर भाषांतर : तफावत आढळल्यास मुळ इंग्रजी मजकूर ग्राहय

पंजाब नॅशनल बँक (भारत सरकारचा उपक्रम) | punjab national bank | ORIENTAL | United

एआरएमबी, नाशिक
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.co.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस
(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

सेक्युरिआयझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेद्वारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

लॉट क्र.	शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे	अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. ३०.०४.२०२२ रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष / रचनात्मक	अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम	लिलावाचे दिनांक व वेळ	कर्जदारांच्या बोझाचा तपशील
१	**शाखा- समर्थ नगर औरंगाबाद (०७०९१०) कर्जदार - श्री. शेख अशफाक शेख मुख्तार** पत्ता - फ्लॅट नं. ए-१५, स्टिल्ट मजला, ए विंग, नरहरी घृष्णेश्वर, गट नं. १५४ भाग, देवगिरी व्हॅली मागे, एकलव्य फाऊंडेशन जवळ, सायली चॅरीटेबल ट्रस्ट कॉलेज ऑफ फारमसी मागे, समर्थनगर जवळ, मिटमिटा गाव, ता.जि. औरंगाबाद- ४३१ ००१ **सहकर्जदार - श्रीमती समिना बेगम अशफाक शेख,** पत्ता - फ्लॅट नं. ए-१५, स्टिल्ट मजला, ए विंग, नरहरी घृष्णेश्वर, गट नं. १५४ भाग, देवगिरी व्हॅली मागे, एकलव्य फाऊंडेशन जवळ, सायली चॅरीटेबल ट्रस्ट कॉलेज ऑफ फारमसी मागे, समर्थनगर जवळ, मिटमिटा गाव, ता.जि. औरंगाबाद- ४३१ ००१	फ्लॅट नं. ए-१५, स्टिल्ट मजला, ए विंग, नरहरी घृष्णेश्वर, गट नं. १५४ भाग, देवगिरी व्हॅली मागे, एकलव्य फाऊंडेशन जवळ, सायली चॅरीटेबल ट्रस्ट कॉलेज ऑफ फारमसी मागे, समर्थनगर जवळ, मिटमिटा गाव, ता.जि. औरंगाबाद- ४३१ ००१ **चतुःसिमा - पुर्व** -जिना **पश्चिम** - विंग बी **उत्तर** - बालकनी **दक्षिण** - जिना आणि फ्लॅट नं. ए-१४ Property ID-**PUNB000828800183**	अ) ३०.०४.२०२२